सन २०१४-२०१५ या वित्तीय वर्षाकरीता जमीन महसूलावरील उपकर अनुदानाकरीता **" दुसरे वितरण "** ३६०४- स्थानिक संस्था व पंचायत राज संस्था यांना नुकसान भरपाईच्या व अभिहंस्तांकित रकमा देणे (दत्तमत) -१०१- जमीनमहसूल (०१)(०१) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम १९६१ व मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ अन्वये जिल्हा परिषदां,पंचायत समित्या व ग्राम पंचायतींना जमीन महसूलावरील उपकर अनुदान मागणी क्रमांक एल-५ (३६०४०४७९)

महाराष्ट्र शासन

ग्राम विकास विभाग

शासन निर्णय क्रमांकः बीजीटी २०१५/प्र.क्र.३८/वित्त-३,

बांधकाम भवन,मर्झबान रोड,

फोर्ट-१,मुंबई-४००००१.

तारीख: **१९ जानेवारी,२०१६.**

वाचा :-

1) **शासन परिपत्रक क्र. अर्थसं २०१५/प्र.क्र.८५/अर्थसंकल्प-३,दिनांक १७ एप्रिल,२०१५.**
2) **शासन निर्णय क्रमांकः बीजीटी -२०१५/प्र.क्र.३८/वित्त-३, दिनांक -१४/५/२०१५.**
3) **शासन परिपत्रक क्र. अर्थसं २०१५/प्र.क्र.८५/अर्थसंकल्प-३,दिनांक १२ जानेवारी,२०१६.**

शासन निर्णय:-

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ मधील कलम १४४,१५१,१५२ व १५५ तसेच मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ मधील कलम १२७,१३१ मधील तरतुदीनुसार जिल्हा परिषदां, पंचायत समित्या आणि ग्राम पंचायतींना जमीन महसूल व जमीन महसूलावरील उपकर अनुदाने वितरित करण्याबाबतची सुधारित कार्यपध्दती शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्र.एलएफसी १०९२/सीआर- १९६३/२४, दिनांक २२ एप्रिल १९९२ अन्वये विहित करण्यांत आलेली आहे. ही उपकर अनुदाने मंजूर करता यावीत म्हणून सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षाकरीता रु.१२३,५८,७५,०००/- (रुपये एकशे तेवीस कोटी अठ्ठावन्न लक्ष पंच्याहत्तर हजार फक्त) इतकी तरतूद करण्यांत आली आहे.

२. वित्त विभागाच्या परिपत्रक क्र. अर्थसं २०१५/प्र.क्र.८५/अर्थसंकल्प-३,दिनांक १७ एप्रिल,२०१५ अन्वये आवश्यक असणारा योजनेतर अर्थसंकल्पीत निधी ७०% च्या मर्यादेत वितरण करण्यास मान्यता दिली आहे.त्यानुसार सदर तरतूदीपैकी माहे एप्रिल २०१५ ते नोव्हेंबर २०१५ या आठ महिन्याकरीता रु.८६,५१,१२,५००/- (रुपये शहाऐंशी कोटी एकावन्न लक्ष बारा हजार पाचशे फक्त) एवढे अनुदान वितरीत करण्यांत आलेले आहे.

३. आता वित्त विभाग परिपत्रक क्र. अर्थसं-२०१५/प्र.क्र.८५/अर्थसंकल्प-३,दि.१२ जानेवारी,२०१६ अन्वये अर्थसंकल्पीत निधी खर्च करण्याची मर्यादा ८५% एवढी विहीत करण्यांत आली आहे. त्यास अनुसरून उर्वरीत कालावधीसाठी जमीन महसूल उपकर (३६०४ ०४७९) या वरील अनुदानासाठी रु. १८,५३,८१,२५०/- (रुपये अठरा कोटी त्रेपन्न लक्ष एक्याऐंशी हजार दोनशे पन्नास फक्त) एवढया रकमा प्रस्तुत शासन निर्णयान्वये जिल्हाधिका-यांना त्यांच्या क्षेत्रातील जिल्हा परिषदांना वसूलीच्या आधारे जमिन महसूलावरील उपकर अनुदानाच्या रक्कमा मंजूर करणे शक्य व्हावे म्हणून सर्व विभागीय आयुक्तांकडे सुपूर्द करण्यांत येत आहे. अशाप्रकारे आतापर्यंत जमीन महसूल उपकरासाठी रु.१०५,०४,९३,७५०/- (रुपये एकशे पाच कोटी चार लक्ष त्र्याण्णव हजार सातशे पन्नास फक्त) अनुदान वितरीत करण्यांत आले आहे.

४. सदर रकमांचे वाटप करतांना विभागीय आयुक्तांनी या विभागाकडे सादर केलेल्या मागणीच्या प्रमाणात जिल्हा परिषदांना मंजूर अनुदानाचे वाटप करण्याची दक्षता घ्यावी. या शासन निर्णयासोबत जोडलेल्या विवरणपत्रातील **स्तंभ क्रमांक-५** मध्ये दर्शविलेल्या अनुदानापेक्षा जास्त वाटप होणार नाही याची विभागीय आयुक्तांनी दक्षता घ्यावी.

५. या शासन निर्णयान्वये मंजूर केलेली अनुदाने विभागीय आयुक्तांनी संबंधित जिल्हाधिका-यांकडे पंचायत राज संस्थांना मंजूर करण्यासाठी त्वरित सुपूर्द करावीत आणि वाटप केलेल्या आदेशाच्या प्रती शासनाकडे पाठवाव्यात.

६. जिल्हा परिषदांनी या बाबींवर होणारा खर्च ग्राम विकास व जलसंधारण विभाग मागणी क्रमांक एल -५ "३६०४- स्थानिक संस्था व पंचायत राज संस्था यांना नुकसान भरपाईच्या व अभिहस्तांकित रक्कमा देणे-१०१ जमीन महसूल (०१)(०१) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम १९६१ व ग्रामपंचायत अधिनियम १९५८ अन्वये जिल्हा परिषदा, पंचायत समित्या व ग्राम पंचायतींना जमीन महसूल उपकर अनुदाने इत्यादी संबंधात अभिहस्तांकित रकमा देणे (जमीन महसूलावरील उपकर अनुदाने) (३६०४०४७९) या लेखाशिर्षाखाली दाखवावा व सन २०१४-२०१५ या वित्तीय वर्षात अधिनस्त ठेवलेल्या तरतूदीमधून खर्ची टाकावा. ही अनुदाने शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्देशित केलेल्या विहित अटी व शर्तीच्या अधीन राहतील.

७. हा शासन निर्णय वित्त विभागाचे परिपत्रक क्र. अर्थसं २०१५/प्र.क्र.८५/अर्थसंकल्प-३, दि.१२ जानेवारी,२०१६ नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०११९१५३७०४३३२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Pandurang Rawaji Khotare

Digitally signed by Pandurang Rawaji Khotare
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Section Officer, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=241eb93ab449def8114b5fbff2ea51ab0f16e0092f0102aa9502d0457228dd65, cn=Pandurang Rawaji Khotare
Date: 2016.01.20 11:37:59 +05'30'

(पां.रा.खोटरे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१) सर्व विभागीय आयुक्त
२) सहाय्यक आयुक्त (विकास) सर्व
३) महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व परिक्षा), मुंबई (५ जादा प्रतींसह)
४) महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा व परिक्षा), नागपूर (५ जादा प्रतींसह)
५) महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता)मुंबई (५ जादा प्रतींसह)
६) महालेखापाल, महाराष्ट्र- २ (लेखा व अनुज्ञेयता) नागपूर (५ जादा प्रतींसह)
७) निवासी लेखा अधिकारी, लेखा व अधिदान कार्यालय, मुंबई
८) सर्व जिल्हाधिकारी ,
९) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सर्व,
१०) अध्यक्ष,जिल्हा परिषद सर्व,
११) मुख्य लेखा व वित्त अधिकारी,जिल्हा परिषद सर्व,
१२) मुख्य लेखा परिक्षक व स्थानिक निधी लेखा,कोकण भवन,बेलापूर,नवी मुंबई,
१३) उप मुख्य लेखा परिक्षक व स्थानिक निधी लेखा , कोकण भवन, बेलापूर, नवी मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर.
१४) महसूल व वन विभाग, एल -५, मंत्रालय, मुंबई
१५) कार्यासन अधिकारी, वित्त विभाग, व्यय-१५, अर्थसंकल्प-१६, अर्थोपाय, मंत्रालय, मुंबई,

<u>विवरणपत्र</u>

लेखाशीर्ष ३६०४०४७९- स्थानिक संस्था व पंचायत राज संस्था यांना नुकसान भरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा देणे, या खाली जिल्हा परिषदांना देय असलेल्या सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षातील **जमिन महसूल उपकर** अनुदानाकरीता मंजूर करावयाचे दुसरे वितरण. (शासन निर्णय क्रमांक : बीजीटी -२०१५/प्र.क्र.३८/वित्त-३), दिनांक :- १९ जानेवारी,२०१६चे सहपत्र

(आकडे रुपयात)

अ. क्र.	विभागीय आयुक्तांचे नांव	सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षाकरीता केलेली अंदाज पत्रकीय तरतूद.	या शासन निर्णया अन्वये माहे एप्रिल २०१५ ते नोव्हेंबर २०१५ करीता मंजूर करावयाचे अनुदान	या शासन निर्णया अन्वये माहे मंजूर करावयाचे अनुदान	अक्षरी	शासन निर्णयापर्यत मंजूर केलेले अनुदान
१	२	३	४	५	६	७
१	कोकण विभाग, कोकण.	१९०३७७०००	१३३२६३९००	२८५५६५५०	रुपये दोन कोटी पंच्याऐंशी लक्ष छप्पन हजार पाचशे पन्नास फक्त	१६१८२०४५०
२	नाशिक विभाग, नाशिक.	४२५५५९०००	२९७८९१३००	६३८३३८५०	रुपये सहा कोटी अडतीस लक्ष तेहतीस हजार आठशे पन्नास फक्त	३६१७२५१५०
३	पुणे विभाग, पुणे.	३८५७४६०००	२७००२२२००	५७८६१९००	रुपये पाच कोटी अठ्ठयाहत्तर लक्ष एकसष्ट हजार नऊशे फक्त	३२७८८४१००
४	औरंगाबाद विभाग, औरंगाबाद.	१०५५७८०००	७३९०४६००	१५८३६७००	रुपये एक कोटी अठ्ठावन्न लक्ष छत्तीस हजार सातशे फक्त	८९७४१३००
५	अमरावती विभाग अमरावती,	५९१३५०००	४१३९४५००	८८७०२५०	रुपये अठ्ठयाऐंशी लक्ष सत्तर हजार दोनशे पन्नास फक्त	५०२६४७५०
६	नागपूर विभाग, नागपूर.	६९४८००००	४८६३६०००	१०४२२०००	रुपये एक कोटी चार लक्ष बावीस हजार फक्त	५९०५८०००
	एकूण	**१२३५८७५०००**	**८६५११२५००**	**१८५३८१२५०**	**रुपये अठरा कोटी त्रेपन्न लक्ष एक्याऐंशी हजार दोनशे पन्नास फक्त**	**१०५०४९३७५०**

Pandurang Rawaji Khotare

Digitally signed by Pandurang Rawaji Khotare
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Section Officer, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=241eb93ab449def8114b5fbff2ea51ab0f16e0092f0102aa9502d0457228dd65, cn=Pandurang Rawaji Khotare
Date: 2016.01.20 11:38:35 +05'30'

(पां.रा.खोटरे)
कार्यासन अधिकारी,महाराष्ट्र शासन.